दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
Agro. Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • अंक ०७ • RNI : MAHMAR/2023/87818 • शुक्रवार दि.२५ ऑक्टोबर २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# महाराष्ट्राचा रणसंग्राम : पंतप्रधान नरेंद्र मोदी ८ दिवस महाराष्ट्रात तळ ठोकणार

## महायुतीच्या प्रचारासाठी घेणार ८ जाहीर सभा

**मुंबई (वृत्तसंस्था)–महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीला सुरुवात झाली असून गुरुवारी अनेक दिग्गजांनी आपले उमेदवारी अर्ज भरले. चंद्रकांत पाटील, हर्षवर्धन पाटील, आदित्य ठाकरे, जितेंद्र आव्हाड यांनी शक्तीप्रदर्शन करत आपले नामांकन दाखल केले. २९ ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी भरण्याची तारीख असून त्यानंतर प्रचाराला सुरुवात होणार आहे. महायुतीच्या प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी महाराष्ट्रात येणार आहेत. पंतप्रधान मोदींच्या राज्यात ८ सभा होणार आहेत.**



पंतप्रधान नरेंद्र मोदी ७ नोव्हेंबर ते १४ नोव्हेंबर महाराष्ट्रात तळ ठोकून असणार आहेत. या ८ दिवसांत ते विविध मतदारसंघात जाहीर सभा घेतील. पंतप्रधान मोदी १४ नोव्हेंबरपासून परदेश दौऱ्यावर जाणार आहेत. त्यामुळे त्यांच्या प्रचारासाठी फारसा वेळ नसणार. त्यामुळे या ८ दिवसांत मोदींच्या जास्तीत जास्त सभा घेण्यावर महायुती भर देईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी केवळ भाजपच नाही तर महायुतीच्या घटक पक्षातील उमेदावारांच्या प्रचारासाठी सुद्धा सभा घेतील.आम आदमी पक्षाचे संयोजक अरविंद केजरीवाल विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा प्रचार करणार असल्याची माहिती आहे. केजरीवाल महाविकास आघाडीतील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार तसेच इतर घटक पक्षांचा प्रचार करणार आहेत. मात्र, ते काँग्रेसचा प्रचार करणार नसल्याचे सांगण्यात येत आहे. अरविंद केजरीवाल यांची राज्यात विभागवार सभा होणार असल्याची देखील माहिती आहे. महाराष्ट्रात आम आदमी पक्षाचे संघटन काहीच भागात असून त्या मतदानाचा फायदा महायुतीला होऊ द्यायचा नाही, याची खबरदारी महाविकास आघाडीने घेतली आहे. शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्याकडून अरविंद केजरीवाल यांना प्रचाराचे निमंत्रण देण्यात आले आहे.

### सभांचा धडाका पहायला मिळणार

**विधानसभा निवडणुकीचा प्रचार करण्यासाठी १८ नोव्हेंबर पर्यंत वेळ दिल आहे. त्यामुळे राज्यभरात मोठमोठ्या नेत्यांच्या जाहीर सभांचा धडाका राहणार आहे. विधानसभा निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडी असा थेट सामना होणार आहे. दोघांकडूनही मोर्चबांधणी करण्यात येत असून स्टार प्रचारकांच्या सभांकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. २० नोव्हेंबर रोजी मतदार होणार असून २३ नोव्हेंबर रोजी निकाल लागणार आहे.**

## चंद्रपूर जिल्ह्यात सात उमेदवारांनी दाखल केले नामांकन अर्ज

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर नामांकन दाखल करावयाच्या तिसऱ्या दिवशी आज (दि. २४) चंद्रपूर जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघात एकूण सात उमेदवारांनी नामांकन अर्ज दाखल केले.

यात ७० – राजुरा विधानसभा मतदारसंघात सुभाष रामचंद्र धोटे (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस) आणि वामनराव सदाशिव चटप (स्वतंत्र भारत पक्ष), ७१ – चंद्रपूर विधानसभा मतदारसंघात सुरेश मल्लारी पाईकराव (अपक्ष), ७२ – बल्लारपूर विधानसभा मतदारसंघात निरंक, ७३ – ब्रम्हपुरी विधानसभा मतदारसंघात विजय नामदेवराव वडेट्टीवार (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस), ७४ – चिमूर विधानसभा मतदारसंघात किर्तीकुमार भांगडीया (भारतीय जनता पार्टी) आणि सतिश वारजुकर (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस), ७५ – वरोरा विधानसभा मतदारसंघात प्रवीण सुरेश काकडे (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस) यांनी गुरुवारी नामांकन अर्ज दाखल केले.तर आज ७०–राजुरा विधानसभा मतदारसंघात १९ अर्ज, ७१–चंद्रपूर विधानसभा मतदारसंघात १४ अर्ज, ७२–बल्लारपूर विधानसभा मतदारसंघात १४ अर्ज, ७३–ब्रम्हपुरी विधानसभा मतदारसंघात ३४ अर्ज, ७४–चिमूर मतदारसंघात २० अर्ज आणि ७५–वरोरा विधानसभा मतदारसंघात २० अर्ज असे एकुण सहा विधानसभा मतदारसंघात इच्छुकांकडून १२१ अर्जांची उचल करण्यात आली आहे.

## निवडणूक जिंकलो नाही, तर फाशी घेईन:काय झाडी–काय हॉटेल फेम शहाजी बापू पाटलांचे संजय राऊतांना आव्हान

**सांगोला (वृत्तसंस्था)**

तुम्ही सात–आठ सभा घ्याव्यात. पण मी विजयाचा गुलाल उधळला नाही, तर फास घेऊन मरेन, असे आव्हान सांगोल्याचे आमदार आणि काय झाडी, काय हॉटेल फेम शहाजी बापू पाटील यांनी संजय राऊत यांना दिले आहे. तसेच शहाजी पाटील यांनी पुण्यात सापडलेल्या पैशांवरुन रोहित पवारांवरही निशाणा साधला. पुण्यातील सापडलेले पैसे मोजायला रोहित पवार गेले होते का? असा सवाल शहाजी बापू पाटील यांनी केला. एकनाथ शिंदे गटाने मंगळवारी विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. या यादीत सर्व विद्यमान आमदारांना पुन्हा तिकीट दिले आहे. शहाजी बापू पाटील यांना पुन्हा सांगोल्यातून उमेदवारी जाहीर झाल्यानंतर त्यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांच्यासर रोहित पवारांवर जोरदार हल्लाबोल केला.संजय राऊत हा सकाळी ९ वाजता महाराष्ट्रात भुंकणारा कुत्रा आहे. अशा कुत्र्यांकडे मी लक्ष देत नसतो. माझ्याविरोधात संजय राऊत, त्याचा बाप, आजा यांनी एक नाही तर दहा सभा घेऊ देत...मी त्याला पालथा पाडून तुडवून पुढे जाऊन दाखवेन, असे शहाजी पाटील म्हणाले. संजय राऊतांनी सात–आठ सभा घेऊ द्या, मी विजयाचा गुलाल उधळला नाही, तर फास घेऊन मरेन, असे एकप्रकारे थेट आव्हान शहाजीबापूंनी संजय राऊतांना दिले. उद्धव ठाकरे आणि संजय राऊत यांच्याकडे महाराष्ट्राविषयी कोणतेही व्हिजन नाही. अडीच वर्षांतील त्यांचे एक काम दाखवा, मी एकनाथ शिंदे यांची हजार कामे दाखवू, अशा शब्दांत त्यांनी ठाकरे गटावर टीका केली.पुणे शहरात सापडलेले पैसे उद्योगपती रफिक शेख यांचे होते. त्यांनी ते कबूलही केले आहे. ते पैसे त्यांचे असल्याची जबाबदारी रफिक शेख यांनी घेतली आहे. हे पैसे एका व्यापाऱ्याचे असताना विनाकारण एकनाथ शिंदे यांना बदनाम करण्याचा प्रयत्न संजय राऊत, जितेंद्र आव्हाड आणि रोहित पवार करीत आहेत, असा आरोप शहाजी बापू पाटील यांनी केला. पाठवलेले पैसे पाच कोटी पेक्षा जास्त असल्याचा आरोप करणारे रोहित पवार रफिक भाईंचे पैसे मोजायला गेले होते का? असा टोला शहाजीबापू पाटील यांनी लगावला. रफिक भाईची श्रीमंती संपूर्ण तालुक्याला माहीत असून त्यांनी हे पैसे आपले असल्याचे सांगितल्याने आता हा विषय संपलेला आहे, असंही शहाजीबापू पाटील यांनी 'एका वृत्तवाहिनी'शी बोलताना सांगितले.

## प्रचार वाहनांसह साहित्याचे दरपत्रक ठरले

**वर्धा । प्रतिनिधी**

निवडणूक विभागाने उमेदवारांसाठी प्रचारासाठी आवश्यक असलेल्या विविध वाहनांचे दर निश्चित केले आहेत. मतदानाच्या प्रक्रियेत उमेदवारांना मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रचार करणे अनिवार्य आहे, ज्यासाठी वाहनांचा उपयोग केला जातो.निवडणूक विभागाने टाटा सुमो, बोलेरो आणि काळी–पिवळी जीप यांचे इंधनासह प्रति दिवसाचे भाडे ३,८०० रुपये निश्चित केले आहे. याशिवाय, बैलगाडी आणि घोडगाडीचा दर प्रतितास २ रुपये निश्चित करण्यात आला आहे. या निर्णयामुळे उमेदवारांचा खर्च निर्धारित करण्यात येणार आहे.

उमेदवार प्रचारासाठी वाहने भाड्याने घेऊन



त्यावर ध्वनिक्षेपक लावून बॅनर व पोस्टर देखील लावतात. निवडणुकीदरम्यान प्रत्येक उमेदवाराला ४० लाख रुपयांची खर्चाची मर्यादा पाळावी लागेल. खर्चाची माहिती दर दिवशी निवडणूक विभागाकडे सादर करणे आवश्यक आहे.

**वाहनांचे भाडे**

**ऑटोरिक्षा:* १,००० रुपये प्रति दिवस**

**सायकल रिक्षा:* २ रुपये प्रतितास**

**दुचाकी:* २० रुपये प्रतितास**

**ट्रॉलीसह ट्रॅक्टर:* ३,००० रुपये प्रति दिवस**

**मालवाहू हलके वाहन:* ५,२६० रुपये इंधनासह**

**४० सिटर प्रवासी वाहन:* इंधनाशिवाय ७,७०० रुपये, इंधनासह १०,४०० रुपये**

**१० चाकी वाहन:* १२,८०० रुपये**

**१२ ते १४ चाकी वाहन:* १३,६०० रुपये**

१६ चाकी वाहन:* १५,७०० रुपये

उमेदवारांना या दरांचे पालन करताना खर्चाची मर्यादा लक्षात ठेवावी लागेल. त्यामुळे निवडणूक खर्चाचे हिशेब जुळवताना कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी या दरांची यादी महत्त्वाची ठरते.

## २४ तासांत ५२ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त




**मुंबई । प्रतिनिधी**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी १५ ऑक्टोबरपासून राज्यात आदर्श आचारसंहिता लागू झाली असून, शासनाच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांनी केलेल्या कारवाईत मोठ्या प्रमाणात मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. १५ ते २४ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत ९०.७४ कोटी रुपयांची बेकायदा मालमत्ता जप्त करण्यात आली असून, त्यापैकी गेल्या २४ तासांतच ५२ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.

मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार, महाराष्ट्रातील १९ अंमलबजावणी यंत्रणांनी ही कारवाई केली आहे. पोलिस विभाग आणि इतर तपास यंत्रणांनी राबवलेल्या तपासणी नाक्यांमुळे हे यश मिळाले आहे.

**अंमलबजावणी यंत्रणांकडून जप्त मालमत्ता**

**प्राप्तीकर विभाग: ३०.९३ कोटी**

**महसूल गुप्तचर विभाग: ८.३० कोटी**

**राज्य पोलीस विभाग: ८.१० कोटी**

**नार्कोटिक्स नियंत्रण ब्युरो: २.५० कोटी**

**राज्य उत्पादन शुल्क विभाग: १.७५ कोटी**

**कस्टम विभाग: ७२.६५ लाख**

नागपूर, मुंबई उपनगर आणि रत्नागिरी या जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात कारवाई करण्यात आली. या कारवाईमुळे निवडणूक यंत्रणा सजग असून, मतदारांना प्रलोभन दाखवणारे प्रकार खपवून घेतले जाणार नाहीत, असा स्पष्ट संदेश गेला आहे.

प्राप्तीकर विभागाने धनशक्तीचा वापर रोखण्यासाठी मुंबई येथे २४ तास कार्यरत नियंत्रण कक्ष स्थापन केला असून, नागरिकांना टोल–फ्री क्रमांक आणि ईमेलद्वारे तक्रारी नोंदवता येणार आहेत.

**सी–व्हिजिल पवर ११४४ तक्रारींचे निपटारे:**

१५ ते २४ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत सी–व्हिजिल पवर ११४४ तक्रारी प्राप्त झाल्या असून, त्यापैकी ११४२ तक्रारी निकाली काढण्यात आल्या आहेत. त्यामुळे ९९ टक्के तक्रारींचे निपटारे झाल्याचे निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे.

## धनंजय मुंडे यांनी बहिणींच्या सोबत भरला उमेदवारी अर्ज

**परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी**

राज्याचे कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी गुरुवारी आपला विधानसभा निवडणुकीसाठीचा उमेदवारी अर्ज साध्या पद्धतीने परळी तहसील कार्यालयात दाखल केला. त्यांच्या समवेत विधान परिषदेच्या सदस्या आ. पंकजाताई मुंडे आणि माजी खासदार डॉ. प्रीतमताई मुंडे यांच्यासह परिवारातील अनेक जण उपस्थित होते.

धनंजय मुंडे यांनी अर्ज दाखल करण्यापूर्वी आपल्या मातोश्री रुक्मिणीबाई मुंडे यांच्याकडून औक्षण घेतले, तसेच प्रभू वैद्यनाथाचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले. अर्ज दाखल करण्याआधी त्यांनी स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांना नमन करून कृतज्ञता व्यक्त केली.यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना धनंजय मुंडे म्हणाले, मी कोणतीही निवडणूक हलक्यात घेत नाही. मी केलेली कामे आणि माझ्या मनातील विकासाचे व्हिजन लोकांपर्यंत पोहोचवून मतदानरूपी आशीर्वाद घेण्याची तयारी आहे.आ. पंकजाताई मुंडे यांनी धनंजय मुंडे यांची उमेदवारी अर्जाची सूचक म्हणून भूमिका निभावली. त्या म्हणाल्या, धनु भाऊंनी परळीसाठी केलेल्या कामांच्या बळावर त्यांचा विजय निश्चित आहे, आणि मी देखील त्यांच्या प्रचारासाठी मैदानात उतरणार आहे.अर्ज दाखल करण्याच्या प्रसंगी अनेक महत्त्वाचे नेते आणि कार्यकर्ते उपस्थित होते.



# काँग्रेसचे आमदार माधवराव पाटील यांना हदगाव-हिमायतनगर मतदारसंघातून तिकीट फिक्स

**नांदेड । बालाजी पाटिल**

काँग्रेस पक्षाचे लाडके व लोकप्रिय नेते, आमदार माधवराव पाटील जवळगावकर यांनी हदगाव-हिमायतनगर मतदारसंघातून पाचव्यांदा निवडणूक लढवण्यासाठी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. गुरुपुष्यामृत योगाच्या शुभ मुहूर्तावर एकराळा, ता. हदगाव येथे संतोषी मातेचे दर्शन घेतल्यानंतर त्यांनी आपल्या उमेदवारीसाठी नामनिर्देशन अर्ज दाखल केला. यावेळी त्यांच्या सोबत त्यांच्या धर्मपत्नी, कन्या तसेच काँग्रेसचे पदाधिकारी आणि स्थानिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



माधवराव पाटील जवळगावकर यांची हदगाव-हिमायतनगर मतदारसंघात निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून ओळख आहे. त्यांनी वयाच्या २४व्या वर्षापासून राजकारणात पाऊल टाकताच समाजसेवेचा ध्यास घेतला. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी तालुक्यातील विविध विकासकामांना गती दिली आहे. रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्यसेवा, शिक्षण आणि ग्रामविकासाच्या विविध योजनांत त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. विशेषतः मराठा आरक्षणासाठी त्यांनी घेतलेली भूमिका आणि त्यासाठी दिलेले योगदान जनतेत विशेष चर्चेचा विषय ठरला आहे.हदगाव-हिमायतनगर मतदारसंघात माधवराव पाटील जवळगावकर यांना स्थानिक जनतेचा प्रचंड पाठिंबा आहे. त्यांच्या नेतृत्वाखालील विकासकामे आणि समाजसेवेतील उल्लेखनीय कार्यामुळेच ते जनतेत लोकप्रिय आहेत. त्यांच्या या कार्यामुळे काँग्रेस पक्षाने पुन्हा एकदा त्यांना उमेदवारी देण्याचा निर्णय घेतला आहे. पक्षाकडून २८ तारखेला सोमवारी बी फॉर्म दिला जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली आहे.

मराठा समाजाच्या आरक्षणाच्या प्रश्नावर माधवराव पाटील जवळगावकर यांनी घेतलेली ठाम भूमिका आणि त्यासाठी केलेले प्रयत्न यामुळे ते राज्यभरात ओळखले जातात. या मुद्द्यावर त्यांनी सातत्याने विधानसभेत आवाज उठवला असून, मराठा समाजाच्या मागण्या शासनापर्यंत पोहोचवण्यासाठी त्यांनी मोठे प्रयत्न केले आहेत. याशिवाय, मतदारसंघातील शेतकरी, युवक आणि महिलांसाठी त्यांच्या नेतृत्वाखालील विकास प्रकल्प आणि रोजगार निर्मितीच्या उपक्रमांनी अनेकांचे जीवनमान उंचावले आहे.माधवराव पाटील जवळगावकर यांच्या उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या कार्यक्रमाला त्यांच्या धर्मपत्नी आणि कन्या यांच्यासह काँग्रेसचे नेते, कार्यकर्ते, पदाधिकारी आणि समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह होता आणि त्यांनी आपल्या नेत्याचा विजय निश्चित असल्याचा आत्मविश्वास व्यक्त केला.

### काँग्रेसचे तिकीट फिक्स

**काँग्रेस पक्षाने माधवराव पाटील जवळगावकर यांच्यावर पुन्हा एकदा विश्वास दाखवत त्यांना हदगाव-हिमायतनगर विधानसभा मतदारसंघातून तिकीट दिले आहे. पक्षाकडून २८ तारखेला बी फॉर्म दिला जाईल, अशी माहिती त्यांनी स्वतः आमच्या प्रतिनिधीशी संवाद साधताना दिली. त्यामुळे हदगाव-हिमायतनगर मतदारसंघात आगामी निवडणुकीत मोठा राजकीय संघर्ष पाहायला मिळणार असल्याचे संकेत मिळत आहेत.**

## शेवगाव-पाथर्डीच्या विकासासाठी अंतिम लढाई-अरुण मुंढे यांचा निर्धार

**पाथर्डी । प्रतिनिधी**

शेवगावच्या जनतेच्या प्रगतीसाठी, त्यांच्या हक्कांसाठी, आणि कार्यकर्त्यांच्या विश्वासासाठी मी विधानसभा निवडणुकीत पूर्ण ताकदीने उतरणार आहे. ही लढाई शेवगावच्या विकासाची असून, ती शेवटपर्यंत लढणारच, अशी ठाम घोषणा भारतीय जनता पक्षाचे प्रदेश चिटणीस अरुण मुंढे यांनी केली. शेवगाव येथे आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी निवडणुकीत उतरण्याचा निर्णय जाहीर केला. हॉटेल साई पूजा येथे आयोजित पत्रकार परिषदेत मुंढे यांनी स्पष्ट केले की, कार्यकर्त्यांनी माझ्यावर दाखवलेल्या विश्वासाला मी कमी पडणार नाही. भाजपच्या तिकिटावर लढलो किंवा अपक्ष म्हणून, जनतेच्या मागे उभा राहण्याचा माझा शब्द आहे, असे त्यांनी ठामपणे सांगितले.



मुंढे यांच्या घोषणेमुळे शेवगाव-पाथर्डी मतदारसंघात राजकीय संघर्ष पेटणार असल्याची चिन्हे आहेत. शेवगावच्या विकासासाठी ही निवडणूक मी ताकदीने लढवणार आहे, असे त्यांनी कार्यकर्त्यांसमोर ठासून सांगितले.

बैठकीत भाजपचे तालुकाध्यक्ष तुषार वैद्य, बाळासाहेब सोनवणे, नगरसेवक शब्बीर शेख, अंकुश कुसळकर यांसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यकर्त्यांनी एकमुखाने मुंढे यांना पूर्ण पाठिंबा दर्शवला.मुंढे यांच्या विकासवादी दृष्टिकोनामुळे मतदारांमध्ये नवचर्चा सुरू झाली असून, आगामी निवडणुकीत मतदारसंघातील समीकरणे बदलण्याची शक्यता आहे.

## जिल्ह्यात आचारसंहितेच्या पालनासाठी कडक तपासणी: निवडणूक खर्च निरीक्षक ग्यानेंद्र त्रिपाठी यांची सूचना

**वर्धा । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आचारसंहिता लागू झाली असून, जिल्ह्याच्या सर्व सीमेवर कडक तपासणी मोहिम राबविण्यात येणार आहे. आज जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत निवडणूक खर्च निरीक्षक ग्यानेंद्र त्रिपाठी यांनी बँकांतील मोठ्या व्यवहारांवर लक्ष ठेवण्यासह मतदारांना भेट वस्तूंचे आणि मद्याचे वाटप रोखण्यासाठी भरारी पथकांना बारिक लक्ष ठेवण्याची सूचना दिली.

या बैठकीत जिल्हाधिकारी राहूल कर्डिले, मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान, जिल्हा पोलीस अधीक्षक अनुराग जैन, उपजिल्हाधिकारी निवडणूक अनिल गावित व इतर निवडणूक नोडल अधिकारी उपस्थित होते.निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर करण्यात येणाऱ्या या तपासण्या आणि कार्यवाहीमुळे पारदर्शकता सुनिश्चित होण्यास मदत होईल, असे यावेळी त्रिपाठी यांनी सांगितले.



## हिंगणघाटचे आमदार समीर कुणावार यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला



**हिंगणघाट । प्रतिनिधी**

वर्ध्याचे हिंगणघाटचे आमदार तथा महायुतीचे उमेदवार समीर कुणावार यांनी हिंगणघाट तहसील कार्यालयात उपविभागीय अधिकाऱ्यांच्या कडे उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी माजी केंद्रीय मंत्री प्रल्हाद पटेल, माजी खासदार रामदास तडस यांसारखे अनेक मान्यवर उपस्थित होते.

महायुतीने समीर कुणावार यांना सलग तिसऱ्या वेळेस उमेदवारी दिली आहे. अर्ज दाखल केल्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना कुणावार यांनी विजयाच्या आशेवर बोलताना सांगितले, गेल्या दहा वर्षांत केलेली विकासकामे आणि महायुती सरकारने घेतलेले निर्णय जनतेच्या कल्याणासाठी आहेत.

कुणावार यांचा विश्वास आहे की, जनता विजयाची हॅट्ट्रिक करेल. त्यांनी असेही नमूद केले की, जनतेने केलेल्या विकासकामांवर विश्वास ठेवून पुढे जाणे आवश्यक आहे. यामुळे हिंगणघाटमध्ये आगामी निवडणुकांसाठी राजकीय वातावरण अधिक उत्सुकतेने पाहिले जात आहे.



**तळोधी (बा )परिसरात खरीप हंगामात स्त्री मजुरांद्वारे धान कापणी जोरात सुरु असुन परिसरात हाताला काम मिळाल्यामुले मजूर समाधानी आहेत. छाया :प्रणय बांगरे..**

## राहुरीत माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले यांचा उमेदवारी अर्ज दाखल



**राहुरी । प्रतिनिधी**

राहुरी-नगर-पाथर्डी विधानसभा मतदारसंघाचे भाजप उमेदवार माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले यांनी गुरुवारी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. या वेळी बाजीराव गवारे, काशिनाथ लवांडे, सुभाष पाटील, बाळकृष्ण बानकर, धनराज गाडे यांसह पक्षाचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.कर्डिले यांचा हा चौथा निवडणूक लढाव असून, यंदाही भाजपने त्यांच्यावरच विश्वास दाखवला आहे. त्यांच्या उमेदवारीसह समर्थकांमध्ये मोठा उत्साह दिसून आला. २०१९ च्या निवडणुकीतील पराभवाचे उट्टे काढण्यासाठी कर्डिले समर्थकांनी जोरदार तयारी सुरू केली आहे.राष्ट्रवादी काँग्रेसचे दिग्गज नेते भाजपमध्ये सामील झाल्यामुळे मतदारसंघात शरद पवार यांच्या पक्षाला धक्का बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## निवडणुकीत जबाबदारीने काम करा: जिल्हाधिकारी विनय गौडा




**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीची तयारी सुरू आहे. ही निवडणूक चुरशीची होण्याची शक्यता आहे, त्यामुळे सर्व अधिकारी आणि पोलिसांनी जबाबदारीने काम करावे, अशी सूचना जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी विनय गौडा यांनी दिली.

जिल्ह्यातील क्षेत्रीय अधिकारी आणि क्षेत्रीय पोलिस अधिकाऱ्यांसाठी आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमात प्रियदर्शनी सभागृहात मार्गदर्शन करताना ते बोलत होते. या वेळी मंचावर अतिरिक्त जिल्हाधिकारी श्रीकांत देशपांडे, परिवेक्षाधीन जिल्हाधिकारी डॉ. अपूर्णा भासूर, निवासी उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार, वरोराच्या उपविभागीय पोलिस अधिकारी नयोमी साटम उपस्थित होते.

जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करण्याचे निर्देश दिले. त्यांनी मतदान केंद्रांवरील सर्व कामे सुसूत्रपणे करण्यासाठी अधिकारी आणि पोलिसांमध्ये समन्वय असण्याचे महत्त्व स्पष्ट केले. ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅटच्या सुरक्षित हाताळणीवर विशेष भर देत त्यांनी या प्रक्रियेबाबत अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना योग्य प्रशिक्षण देण्याचे निर्देश दिले.प्रत्येक अधिकारी आणि पोलिसांनी त्यांच्या क्षेत्रातील मतदान केंद्रांची माहिती ठेवावी, त्यात मतदारांची संख्या, मतदान केंद्रांचे अंतर, उपलब्ध सोयीसुविधा यांचा समावेश असावा. तसेच मतदान केंद्रांना भेट देऊन आवश्यक तयारी करावी, असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.शासकीय वाहनांचाच वापर करावा, खाजगी वाहनांचा वापर टाळावा, तसेच वाहन खाजगी ठिकाणी किंवा हॉटेलसमोर उभे करू नये, असेही आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.कार्यक्रमाचे संचालन निवासी उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार यांनी केले. प्रशिक्षणाला जिल्ह्यातील क्षेत्रीय अधिकारी, उपविभागीय पोलिस अधिकारी आणि इतर कर्मचारी उपस्थित होते.

## शक्तीप्रदर्शन करीत अशोक पवार यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**शिरूर । रमेश बनसोडे**

शिरूर-हवेली विधानसभा मतदारसंघासाठी महाविकास आघाडीचे उमेदवार राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अशोक रावसाहेब पवार यांनी गुरुवारी मोठ्या शक्तीप्रदर्शनासह आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. या वेळी खासदार संसदरत्न डॉ. अमोल कोल्हे आणि खासदार निलेश लंके यांची प्रमुख उपस्थिती होती.

शिरूरच्या निवडणूक निर्णय अधिकारी संगीता राजापूरकर व सहाय्यक निवडणूक अधिकारी तहसीलदार बाळासाहेब म्हस्के यांच्याकडे अर्ज सादर करण्यात आला.

अर्ज भरण्यापूर्वी आमदार अशोक पवार यांनी वडगाव रासाई येथील रासाई देवी, श्री रामलिंग शिरूर मंदिर, आणि घरातील कुलदेवता यांचे आशीर्वाद घेतले.



शिरूर बाजार समितीतील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून त्यांनी शक्तीप्रदर्शनाची सुरुवात केली. त्यानंतर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करत, शहरातील प्रमुख रस्त्यांवरून मिरवणूक काढण्यात आली. या रॅलीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तुतारी चिन्ह, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे मशालीचे फोटो, तसेच काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे झेंडे फडकत होते. या मिरवणुकीत महिलांसह मोठ्या संख्येने कार्यकर्ते सहभागी झाले होते.

शिरूर-हवेली मतदारसंघात मिळालेल्या आशीर्वादाबद्दल अशोक पवार यांनी नागरिकांचे आभार मानले आणि तालुक्याचा विकास हेच आपले ध्येय असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. महायुतीचे उमेदवार अद्याप जाहीर झाले नाहीत. त्यांच्या कडे उमेदवार नसल्यामुळे आयात उमेदवार घेण्यात येत आहे. मी माझ्या विकास कामांवर विश्वास ठेवून या निवडणुकीत उतरलो आहे, असेही त्यांनी नमूद केले.

## उसळत्या रक्तात माझ्या ज्वालामुखीचा दाह दे.....

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या वरील गौरव गीतांनी रसिक मंत्रमुग्ध

**वरोरा । प्रतिनिधी**

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे हे वर्ष जन्मत्रिशताब्दी वर्ष म्हणून साजरे होत असताना वरोड्यात श्रीराम उपासना मंडळाच्या वतीने आयोजित पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जीवनदर्शन या सांगितीक कार्यक्रमाने रसिक मंत्रमुग्ध झाले. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या शौर्याला अधोरेखित करणाऱ्या कार्यक्रमाची संकल्पना आणि निर्मिती सुवर्णरेखा पाटील यांनी केली. अहिल्याबाईंच्या जीवनावर आधारित विविध गीते त्यांनी आपल्या सुरेल आवाजात रसिकांच्या पुढे सादर करून अहिल्याबाईंच्या जीवनातील विविध कंगोरे उलगडले. प्रजेवर मातृ व्रत करणाऱ्या लोकहीतदक्ष तसेच मातृरुपेन संस्थिताम असा ज्यांच्या कर्तृत्वाचा गंध मराठी मुलखाबाहेर दरवळला अशा लोकमातेचे जीवन दर्शन नव्या पिढी पुढे साकार व्हावे या उद्देशाने सुवर्णरेखा पाटील यांनी एकापेक्षा एक बहारदार गीतांची गुंफण या कार्यक्रमात सादर केली. 'कर्म योगिनी राज योगिनी, जय अहिल्या माता' या गीतांवर सादर केलेले नृत्य वेधक होते. 'योगीनी तू, माणिनी तू, हे अहिल्या तूच जननी वत्सल', 'जर जाशी काशीस.. रामेश्वराला', 'त्रिभुवनी वाजे तवकीर्ती..' आदी गीतांनी रसिकांची



वाहवा मिळविली. पहिली स्त्री समाज सुधारक व लोकमाता या उपाधीने गौरविण्यात आलेल्या अहिल्यादेवीचे शौर्य डॉ जयश्री शास्त्री यांनी आपल्या अभ्यासपूर्ण विवेचनातून रसिकांच्या पुढे मांडले. अहिल्याबाईंना संस्कृत, मराठी, हिंदी भाषा अवगत होत्या. त्यांनी विविध भाषांमधून दर्जेदार लेखन केले. काशी क्षेत्राला उच्च ज्ञानाचे तीर्थ म्हणून ओळखले जाते ते अहिल्यामुळेच. त्यांनी अनेक किल्ले, परकोट, मंदिरे, धर्मशाळा आणि घाट बांधून इतिहासाचे संवर्धन केले. त्र्यंबकेश्वर, प्रयाग, भीमाशंकर, गंगोत्री, केदारनाथ, कुरुक्षेत्र, चित्रकूट या ठिकाणी त्यांनी चौफेर कार्य केले. प्राचीन बारा ज्योतिर्लिंग व चार धाम तीर्थक्षेत्रे त्यांनी बळकट केले. विस्कटलेली धर्मक्षेत्रे पुन्हा उभारून धर्माचे पालन करण्यात अहिल्याबाईंचा चा वाटा असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. उसळत्या रक्तात माझ्या ज्वालामुखीचा दाह दे.....' आणि अहिल्याबाईंवरील एका गीतावर सादर केलेला गोंधळ हे कार्यक्रमाची उंची वाढविणारे ठरले. मंगेश मल्हार, संदीप कनोजवार, फकीरा निखाडे आणि रोहित चौधरी यांनी वाद्यांवर साथ संगत केली. संचालन प्रा हिमगौरी देशपांडे तर प्रास्ताविक उमेश लाभे यांनी केले. रसिकांची मोठी उपस्थिती कार्यक्रमाला होती.

# ऑल आऊट ऑपरेशन दरम्यान घातक शस्त्र बाळगणाऱ्या गुन्हेगारास जेरबंद

**सत्यम भोसले । अहमदनगर**

राहुरी शहरातील १८ एकर परिसरात घातक शस्त्र बाळगून दहशत निर्माण करणाऱ्या आरोपीला राहुरी पोलिस पथकाने मुसक्या आवळून जेरबंद केले. ही घटना २३ ऑक्टोबर २०२४ रोजी घडली.

२३ ऑक्टोबर २०२४ रोजी रात्रीच्या वेळी ऑल आऊट ऑपरेशन दरम्यान पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांना गोपनीय बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, राहुरी शहरातील १८ एकर परिसरात एक इसम घातक शस्त्र बाळगून दहशत करत फिरत आहे. या माहितीच्या आधारे, पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार सुरज गायकवाड, राहुल यादव, प्रमोद ढाकणे, सतीश कुराडे, नदीम शेख, अंकुश भोसले, गोवर्धन कदम यांच्यासह पोलिस



पथकाने १८ एकर परिसरात छापा टाकला. त्यावेळी आरोपी शशिकांत सुखदेव बर्डे (वय २९ वर्षे, रा. बारगाव नांदूर, ता. राहुरी) हा बेकायदेशीर रित्या लोखंडी पाते असलेले कत्ती जवळ बाळगून दहशत करताना आढळून आला. पोलिस पथकाने त्याच्या मुसक्या आवळून ताब्यात घेतले.

पोलिस नाईक प्रमोद सुखदेव ढाकणे यांच्या फिर्यादीवरून आरोपी शशिकांत सुखदेव बर्डे याच्यावर आर्म ॲक्ट अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार राहुल यादव करीत आहेत.

# श्रीरामपूर मतदारसंघातील उमेदवारी वर दोन दिवसांत निर्णय होणार

**सत्यम भोसले । अहमदनगर**

श्रीरामपूर विधानसभा मतदारसंघातील उमेदवारीबाबत समविचारी पक्ष व संघटनांसोबत चर्चा करून प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष बच्चु कडू यांच्या मार्गदर्शनात दोन दिवसांत निर्णय घेण्यात येईल, असे श्रीरामपूर विधानसभा मतदारसंघाचे प्रमुख अप्पासाहेब ढूस यांनी सांगितले.

प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय बच्चु कडू यांच्या आदेशानुसार, श्रीरामपूर विधानसभा मतदारसंघातील उमेदवार ठरविण्यासाठी प्रहारचे मतदारसंघ प्रमुख अप्पासाहेब ढूस यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार, दि. २३ ऑक्टोबर २०२४ रोजी दुपारी ४ वाजता श्रीरामपूर येथील प्रहारच्या कार्यालयात प्रमुख



पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली.

या बैठकीला श्रीरामपूर विधानसभा मतदारसंघाचे उपाध्यक्ष लक्ष्मणराव खडके, कार्याध्यक्ष चंद्रकांत कराळे, तालुका उपाध्यक्ष दीपक पटारे, तालुका कार्याध्यक्ष नानासाहेब तागड, कार्यकारिणी सदस्य रणजीत शिनारे, तालुका संघटक राजेंद्र चौधरी, श्रीरामपूर शहर प्रमुख सोमनाथ गर्जे, संघटक प्रभाकर कांबळे, युसूफ पठाण, सुमित राहिले यांच्यासह प्रहारचे कार्यकर्ते उपस्थित होते.

बैठकीत समविचारी पक्ष व संघटनांना सोबत घेऊन इच्छुक उमेदवारांची नावे दोन दिवसांत अप्पासाहेब ढूस यांच्यामार्फत प्रहारचे संस्थापक अध्यक्ष बच्चु कडू यांना कळविण्यात येणार आहेत. त्यानंतर बच्चु कडू यांच्या मान्यतेने अंतिम उमेदवारांची घोषणा ढूस करतील, असे बैठकीत सर्वानुमते ठरले.

# वेगवान कारवाईत लातूर पोलिसांकडून अपहरणकर्त्यांना अटक; एअरगन, लोखंडी चाकूसह वाहन जप्त

**लातूर । प्रतिनिधी**

गांधी चौक पोलीस ठाणे हद्दीत दि. २२ ऑक्टोबर २०२४ रोजी दाखल झालेल्या फिर्यादीनुसार, फिर्यादीच्या मुलाचे अपहरण केल्याची तक्रार प्राप्त झाली आहे. फिर्यादीने दिलेल्या तक्रारीनुसार, त्याच्या मुलाचे मांजरा आयुर्वेदिक महाविद्यालयासमोर, गांधी मार्केट, लातूर येथून काही आरोपींनी जोरजबरदस्तीने अपहरण केले. हा वाद फिर्यादीच्या बहीणीच्या नावे असलेल्या जमिनीच्या वादातून घडला असून, अपहरणकर्त्यांनी खून करण्याच्या उद्देशाने हा गुन्हा केला असल्याचे फिर्यादीने नमूद केले आहे. तक्रारीनंतर गांधी चौक पोलीस ठाण्यात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याची नोंद होताच पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, सहाय्यक पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली




पोलीस निरीक्षक साहेबराव नरवाडे यांनी तातडीने पथक तयार केले. आरोपींचा शोध घेण्यासाठी पथकाने तत्परतेने काम सुरू केले. दरम्यान, सहाय्यक पोलीस निरीक्षक सदानंद भुजबळ यांना मिळालेल्या माहितीनुसार, आरोपींनी अपहरण केलेल्या मुलास येरमाळा येथून बार्शीकडे नेण्याचा प्रयत्न केला होता. यानंतर बार्शी ग्रामीण पोलिसांच्या मदतीने नाकाबंदी करण्यात आली. गांधी चौक पथकाने आरोपींचा पाठलाग करत त्यांना बार्शी तालुक्यात ताब्यात घेतले.

तपासादरम्यान, आरोपींनी आपली नावे नरसिंग ऊर्फ मुन्ना राजकुमार कांबळे (४२), तुकाराम वामनराव साळुंके (४३), मंगेश नागनाथ वंजारे (३८), शंकर अंगद कोयाळकर (३४) अशी सांगितली. त्यांच्यासोबत असलेल्या मुलास टोयोटा कार (एमएच १० बीएम ४५५६), लोखंडी चाकू, आणि एअर पिस्टलसह ताब्यात घेतले. आरोपींना गुन्हा क्रमांक ६९१/२०२४, भारतीय न्यायसंहितेच्या विविध कलमांतर्गत अटक करण्यात आली आहे. त्यांना न्यायालयासमोर हजर करण्यात आले असता, पोलीस कोठडी सुनावण्यात आली.

पोलीस निरीक्षक साहेबराव नरवाडे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने अतिशय वेगाने कारवाई करत आरोपींना काही तासांतच ताब्यात घेतले. या कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक सदानंद भुजबळ, पोलीस उपनिरीक्षक आक्रम मोमीन, पोलीस अमलदार वाजिद चिखले, संपत कांदे, राजेंद्र टेकाळे, शिवाजी पाटील, संतोष गिरी, बाळू सारोळे, प्रकाश भोसले, आणि राम गवारे यांचा समावेश होता.

# खर्च निरीक्षकांची मिडीया सेंटरला भेट



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हास्तरावर जाहिरातींचे प्रमाणीकरण, पेडन्यूज, फेकन्यूज, समाज माध्यमांवर लक्ष ठेवण्यासाठी जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समिती (एम.सी.एम.सी) स्थापन करण्यात आली आहे.

या समितीचे कार्य जिल्हा माहिती कार्यालयाच्या मिडीया सेंटर येथून सुरू असून या सेंटरला खर्च निरीक्षक आदित्य बी. आणि धमेंद्र सिंग यांनी भेट देऊन पाहणी केली. यावेळी खर्च निवडणूक निरीक्षकांचे संपर्क अधिकारी तथा मुख्य वित्त व लेखा अधिकारी अतुल गायकवाड, जिल्हा माहिती अधिकारी राजेश येसनकर उपस्थित होते.यावेळी निरीक्षक आदित्य बी. आणि धमेंद्र सिंह यांनी स्थानिक लोकल केबल नेटवर्कवर विशेष लक्ष द्यावे, अशा सुचना दिल्या. सोशल मिडीयावर करण्यात येणा-या पोस्टबाबत अतिशय गांभिर्याने लक्ष ठेवावे, वृत्तपत्रात पेडन्यूज तसेच फेकन्यूज प्रकाशित झाल्यास त्वरीत कार्यवाही करावी, असे निर्देश त्यांनी दिले.यावेळी मिडीया सेंटरमध्ये कार्यरत असलेले सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# माजी खा.इम्तियाज जलील यांनी वैजापूर येथून घेतला उमेदवारी अर्ज

**वैजापूर । छत्रपती संभाजीनगर**

माजी खासदार इम्तियाज जलील यांनी वैजापूर विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी अर्ज घेतल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. जलील हे वैजापूर मतदारसंघातून निवडणूक लढवणार असल्याची चर्चा आता जनतेत सुरू झाली आहे. त्यामुळे येथील राजकारणात मोठे बदल घडतील, अशी चर्चा मतदारसंघात रंगू लागली आहे.

विधानसभा निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयातून उमेदवारी अर्ज स्वीकृती आणि विक्रीची प्रक्रिया सुरू झाली आहे. या दोन दिवसांत निवडणुकीसाठी १८ इच्छुकांनी ३९ उमेदवारी अर्ज घेतले आहेत. विशेष म्हणजे, या मतदारसंघात दोन्ही शिवसेना गट आमनेसामने आले आहेत. शिवसेना शिंदे गटाकडून विद्यमान आमदार प्राध्यापक रमेश बोरणारे तर शिवसेना ठाकरे गटाकडून माजी



नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी यांना उमेदवारी देण्यात आली आहे. आता माजी खासदार इम्तियाज जलील यांनी उमेदवारी अर्ज घेतल्यामुळे वैजापूरमध्ये महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी तिरंगी लढत होणार आहे.

२०१९ लोकसभा निवडणुकीत वंचित बहुजन आघाडी आणि एमआयएम युतीचे उमेदवार असलेले इम्तियाज जलील यांनी वैजापूर मतदारसंघातून कोणतीही प्रचारसभा न घेता मुस्लिम आणि दलित मतदारांकडून तब्बल ३५ हजार मते मिळवली होती. त्याचप्रमाणे, यंदाच्या लोकसभा निवडणुकीत देखील त्यांना वैजापूर तालुक्यातून २५ हजार मते मिळाली होती. महाविकास आघाडीत एमआयएमला सामील करून घेण्यासाठी जलील यांनी प्रयत्न केले, मात्र त्यांना अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही.

माजी खासदार इम्तियाज जलील, माजी नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी, माजी नगराध्यक्ष शिल्पा परदेशी, एकनाथराव जाधव, प्रशांत सदाफळ, अजय साळुंखे, दिगंबर गायकवाड, दादा घायवट, मंजरी गाढे, बाबासाहेब पगारे, मनीषा सदाफळ यांसह इतर इच्छुकांनी उमेदवारी अर्ज खरेदी केल्याची माहिती निवडणूक विभागातील रईस शेख यांनी दिली.

## उमरखेड पोलिसांची कारवाई

# कैलास नगर बेलखेड येथे गावठी हातभट्टी दारूचा कारखाना उद्ध्वस्त

**उमरखेड । प्रतिनिधी**

कैलास नगर बेलखेड येथे पोलिसांनी गोपनीय माहितीच्या आधारे गावठी हातभट्टी दारू तयार करणाऱ्या आरोपीवर मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत मोठ्या प्रमाणात दारू निर्मितीचा साठा जप्त करण्यात आला आहे.

प्राप्त माहितीनुसार, आरोपी नेहरू देवराव राठोड (वय ४५ वर्षे) याने आपल्या घरी गावठी हातभट्टी दारू तयार करत असल्याची माहिती उमरखेड पोलिसांना मिळाली. मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे, उपविभागीय पोलिस अधिकारी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पोलिस निरीक्षक पांचाळ यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांनी त्वरित कारवाई करत छापा



टाकला.

या छाप्यामध्ये १२०० लिटर सडवा मोहा, ज्याची अंदाजे किंमत ३५ रुपये प्रति लिटर प्रमाणे ४२ हजार इतकी आहे, तसेच २५ लिटर गावठी हातभट्टी दारू, ज्याची किंमत १०० रुपये प्रति लिटर प्रमाणे २ हजार ५०० आहे, असा एकूण ४४ हजार ५०० रुपयांचा माल जप्त करण्यात आला.

पोलिसांनी सडवा मोहा आणि अन्य रसायने जागेवरच नष्ट केली, जे दारू निर्मितीसाठी वापरण्यात येत होते. या कारवाईमुळे गावात अनधिकृत दारू निर्मिती करणाऱ्यांच्या हालचालींना मोठा धक्का बसला आहे.

या प्रकरणी आरोपी नेहरू देवराव राठोड याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उमरखेड पोलिसांनी केलेल्या या यशस्वी कारवाईचे सर्वत्र कौतुक होत आहे, आणि यामुळे स्थानिक स्तरावर दारू निर्मितीविरुद्ध पोलिसांची धडक मोहीम अजून तीव्र होण्याची शक्यता आहे

# सर्वधर्म समभावनेतून कार्य केल्यास देशाच्या प्रगतीत हातभार-ना.सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला विश्वास

## बल्लारपुरात सर्व धर्मीयांसाठी 'भारत माता' सभागृहाची होणार निर्मिती



**बल्लारपूर । प्रतिनिधी**

बल्लारपूर शहरात विविध जाती, धर्म व पंथाचे लोक वास्तव्यास आहेत. समाजात ऐक्य, शांतता आणि परस्पर बंधूभाव देखील तितकाच महत्त्वाचा आहे. मागील अनेक वर्षांपासून जनसेवेचे व्रत हाती घेतले असून जात, पात, धर्म, वंश न पाहता सर्वसामान्य व कष्टकऱ्यांची सेवा करणे हा भाव मनात ठेवून कार्य केले आहे. बल्लारपूर मतदारसंघाच्या विकासाकरीता सर्वांनी एकत्र येण्याची आवश्यकता आहे. सर्वधर्म समभाव ठेवून एकत्रित येऊन कार्य केल्यास जिल्ह्याच्या तसेच देशाच्या प्रगतीत हातभार लागेल, असा विश्वास राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.बल्लारपूरात सर्व धर्मीयांचे एकत्रीकरण व्हावे, या उद्देशाने भारत माता सभागृहाची निर्मिती करण्यात येणार असल्याचेही ना. मुनगंटीवार म्हणाले.

बल्लारपूर येथे आयोजित सर्वधर्म सद्भावना कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी कार्यक्रमाला भंतेजी भिख्खू खेमाजी, जगदीश सिंग, तिरलोक सिंग ग्यानीजी, पास्टर गोपाल अटकुरे, राकेशजी पांडे, अहमद रजा नूरानीजी, रविश सिंग, साजिद कुरेशी तसेच सर्वधर्मीय नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. राजनीतीपेक्षाही मोठी राष्ट्रनिती आणि देशनिती आहे, असे सांगून ना. सुधीर मुनगंटीवार म्हणाले, 'मागील अनेक वर्षांपासून जनसेवेचे व्रत हाती घेतले आहे. महाराष्ट्रातील भीमाशंकर, नांदेडमधील गुरुद्वारा तसेच नागपूरमधील ताजुद्दीन बाबांच्या दर्ग्याकरिता निधी उपलब्ध करून दिला. मानवता हाच खरा धर्म आहे. मानवता धर्म पाळत विकासाचे राजकारण केले. जिल्ह्यातील टाटा कॅन्सर केअर हॉस्पिटल हे कोणत्या विशेष जाती, धर्मासाठी नव्हे तर सर्व धर्मियांसाठी उभारण्यात आले आहे. या हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी येणारा प्रत्येक धर्माचा व्यक्ती चेहऱ्यावर आनंद व समाधान घेऊन जाईल.'

जिल्ह्यात विविध शाळा, महाविद्यालये तसेच विद्यापीठांची निर्मिती करण्यात येत आहे. सर्व जाती, धर्मातील विद्यार्थीनींना कौशल्य प्रशिक्षणासाठी एस.एन.डी.टी विद्यापीठाच्या उपकेंद्राची निर्मिती केली जात आहे. या विद्यापीठातून ज्ञान प्राप्त करताना आकाशाला गवसणी घालण्याचा संकल्प येथील सर्वधर्मीय विद्यार्थीनी करतील, असा विश्वास ना. मुनगंटीवार यांनी व्यक्त केला. या जिल्ह्याच्या तसेच मतदारसंघाच्या विकासाकरिता कृषी महाविद्यालय, बसस्थानके, एस.एन.डी.टी. विद्यापीठ, मेडिकल कॉलेज, टाटा कॅन्सर हॉस्पिटल, वन अकादमी, बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र, कार्पेट युनिट, पोलीस स्टेशन, रेल्वे स्टेशन, सिमेंट रोड तसेच पाणीपुरवठ्याच्या अनेक योजना निर्माण करण्यात आल्या आहेत, असेही ना. मुनगंटीवार म्हणाले. ना. मुनगंटीवार म्हणाले, 'पुढील पाच वर्षांकरिता अनेक महत्त्वपूर्ण निर्णय करण्यात आले आहेत. येत्या मार्चमध्ये जिल्ह्यातील रोजगाराचा प्रश्न निकाली काढण्यासाठी ॲडव्हांटेज चंद्रपूरच्या माध्यमातून ७५ हजार कोटींची गुंतवणूक उद्योगांमध्ये होत आहे. पोंभुर्णामध्ये ५ हजार एकरवर लक्ष्मी मित्तल ग्रुप ४० हजार कोटींची गुंतवणूक करणार असून आशियातील सर्वात मोठा उद्योग पोंभुर्णामध्ये उभा राहील. येत्या पाच वर्षात या जिल्ह्यातील तसेच मतदारसंघातील तरुण रोजगारक्षम बनेल, यासाठी विशेष लक्ष देण्यात येत असल्याचेही ना. मुनगंटीवार म्हणाले. बल्लारपूरसह संपूर्ण जिल्ह्यातील विकास कामांची चर्चा देशभरात होत आहे. विकास कामांच्या बाबतीत बल्लारपूर मतदारसंघ देशात आदर्श बनेल, असा विश्वास व्यक्त करत हा जिल्हा विकासाच्या बाबतीत पुढे नेण्याचा संकल्प त्यांनी केला. येत्या पाच वर्षात येथील गोरगरिब व कष्टकऱ्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविणार असल्याचे ना.मुनगंटीवार म्हणाले.

**उद्योगांची पायाभरणी –माझ्या आमदारकी आणि मंत्रिपदाच्या कार्यकाळात जिल्ह्यात विविध उद्योग आणले. चंद्रपूर सुपर थर्मल पावर स्टेशन येथे आठवा व नववा संच उभारणीचे कार्य केले. २००९ पूर्वी मुल एम.आय.डी.सी.मध्ये एक साधा उद्योग देखील नव्हता. त्यानंतर विविध उद्योग मुल एम.आय.डी.सी.मध्ये आले. यामध्ये, कार्निव्हल इंडस्ट्रीज प्रा.लि. ने १७६ कोटी ५० लक्ष रुपयाची गुंतवणूक केली. तालुक्यातील ४२५ नागरिकांना रोजगार उपलब्ध करून दिला. दीनानाथ अलाईड स्टील कंपनीची १६० कोटी रुपयांची गुंतवणूक असून १०० जणांना रोजगार, जी.आर कृष्णा फेरो ॲलाय प्रा. लि. कंपनीची ७४० कोटींची गुंतवणूक असून ७०० जणांना रोजगार, भाग्यलक्ष्मी मेटल प्रा. लि. कंपनीची ४५२ कोटींची गुंतवणूक असून ७५० जणांना रोजगार तसेच सॉईल अँड स्टील प्रा. लि.पृथ्वी अलॉय प्रा. लि., अंबा आयर्न अँड स्टील कंपनी लि., सिद्धबली इस्पात लि., राजुरी स्टील प्रा. लि., ग्रेटा एनर्जी प्रा. लि.आदी उद्योग उभारण्यात आले आहे. असल्याचे ना. मुनगंटीवार यांनी सांगितले.**

# धान पिकावर एकरी खर्च वीस हजार;उत्पन्न मात्र पंचवीस हजारच

**बल्लारपूर । प्रतिनिधी**



तालुक्यात सध्या अल्प मुदतीच्या धान पिकाची कापणी जोरात सुरू आहे. आठवड्याभरानंतर मध्यम प्रतीच्या धानाची कापणी सुरू होईल. मात्र, शेतकऱ्यांना धान पिकाचे उत्पादन घेताना होणाऱ्या खर्च आणि मिळणाऱ्या उत्पन्नामधील फरक मोठ्या प्रमाणावर जाणवत आहे.

धान पिकासाठी एकरी खर्च जवळपास २० हजार रुपये होतो, तर त्याच्या उत्पादनातून सरासरी २२ ते २५ हजार रुपये उत्पन्न मिळते. त्यामुळे शेतकऱ्यांना अल्प नफा मिळत असला तरीही खर्चाच्या तुलनेत उत्पन्न कमी असल्याने शेतकरी आर्थिक कोंडीत सापडत आहे.यंदा केंद्र शासनाने २०२४-२५ हंगामासाठी धान पिकासाठी हमीभाव २,३२० रुपये प्रति क्विंटल जाहीर केला आहे. यानुसार, एकरी १२ ते १५ पोते म्हणजेच ९ ते १० क्विंटल उत्पादन होणाऱ्या धानाला शेतकऱ्यांना २२ ते २५ हजार रुपये मिळू शकतात. मात्र, हे उत्पन्न एकरी खर्च वजा करता अपुरे असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.धान पिकासाठी शेतकऱ्यांना पेरणीपूर्व मशागत, बी-बियाणे, लागवड, फवारणी, आणि काढणी अशा विविध टप्प्यांवर एकरी सुमारे २० हजार रुपये खर्च करावे लागतात. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे

**तक्ता**

**पेरणीपूर्व मशागत: ४,००० रुपये**
**बी-बियाणे: २,००० रुपये**
**लागवड: ५,००० रुपये**
**फवारणी: ४,००० रुपये**
**काढणी: ५,००० रुपये**

**शेती व्यवसाय तोट्यात**

**धान उत्पादनावर होणाऱ्या खर्चाच्या तुलनेत मिळणारे उत्पन्न कमी असल्याने शेतकरी बँकांचे कर्ज परतफेड करण्यास असमर्थ ठरत आहेत. त्यामुळे शेती व्यवसाय तोट्यात असल्याचे शेतकऱ्यांनी व्यक्त केले आहे.**

# शिंदे गटाला धक्का: मुरबाडचे सुभाष पवार राष्ट्रवादीत, तेजस म्हस्कर भाजपात दाखल

**बदलापूर । प्रतिनिधी**



महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राज्यातील सत्ताधारी महायुती आणि शिंदे गटाला मोठा धक्का बसला आहे. मुरबाड मतदारसंघातील शिंदे गटाचे नेते सुभाष पवार यांनी शिवसेना (शिंदे गट)ला रामराम करत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट)मध्ये प्रवेश केला आहे. दुसरीकडे, वामन म्हात्रे यांचे कट्टर समर्थक म्हणून ओळखले जाणारे तेजस (बंटी) म्हस्कर यांनी भाजपामध्ये प्रवेश घेतला आहे.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर किसान कथोरे यांच्या बदलापूर येथील निवासस्थानी भाजपाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची आणि कार्यकर्त्यांची बैठक पार पडली. यावेळी किसान कथोरे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. भारतीय जनता पक्षाच्या विकासवादी धोरणाने प्रेरित होऊन तेजस म्हस्कर यांनी भाजपात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे, असे किसान कथोरे यांनी सांगितले. या बैठकीत वालिवली विभागातील शेकडो कार्यकर्तेही भाजपात दाखल झाले.अंबरनाथ तालुक्यातील गोरेगाव येथील मुस्लिम कार्यकर्त्यांनीदेखील भाजपामध्ये प्रवेश केला आहे. तेजस म्हस्कर यांच्या भाजप प्रवेशाने वामन म्हात्रेंना मोठा धक्का बसला आहे, कारण म्हस्कर हे एकेकाळी त्यांच्या प्रभावक्षेत्रात कार्यरत होते. वामन म्हात्रे यांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढवण्याची तयारी सुरू केली असून, त्यांच्या नेतृत्वाला धक्का लागल्याचे बोलले जात आहे.

# संविधान आणि लोकशाही सजग नागरिकांच्या जागरुकतेनेच टिकेल-शेंडे

**उमरखेड । प्रतिनिधी**




संविधान अमृत महोत्सव वर्षानिमित्त विवेक विचार मंचतर्फे राज्यभरात सामाजिक संवाद मेळाव्यांचे आयोजन करण्यात येत आहे. यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड येथे आयोजित संवाद मेळाव्यात संविधानाच्या महत्वावर चर्चा करण्यात आली. या मेळाव्याचे उद्घाटन सत्र प्रमुख अतिथी गजानन शिंदे यांच्या उपस्थितीत पार पडले. त्यांनी आपल्या भाषणात भारतीय संविधानातील बदलांचा अपप्रचार हा काँग्रेस पक्षाचा नियोजनबद्ध षडयंत्र असल्याचा आरोप केला. अनुसूचित जातीतील लोकांची दिशाभूल करून समाजात अस्थिरता निर्माण करण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

सह्याद्रीचा राखणदार दैनिकाचे सह-संपादक व सामाजिक कार्यकर्ते राहुल मुन यांनी संविधान समाजातील सर्व घटकांच्या विकासाची आणि सुरक्षिततेची हमी देते असे सांगत, संविधानाचा सन्मान राखणे आणि त्याचे जागरण करणे आपली नैतिक जबाबदारी असल्याचे आवाहन केले.मेळाव्याच्या समारोपात विवेक विचार मंचचे विदर्भ प्रांत समन्वयक अतुल शेंडे यांनी संविधान देशाची अस्मिता असल्याचे नमूद केले. त्यांनी सांगितले की, संविधान हा राजकीय चर्चेचा विषय बनू नये आणि कोणत्याही पक्षाने त्यावर राजकारण करू नये. सजग आणि दक्ष नागरिकांच्या सजगतेमुळेच लोकशाही आणि संविधान टिकून राहतील, असे त्यांनी सांगितले. शेंडे यांनी मताधिकाराचा योग्य वापर करून ही जबाबदारी पार पाडण्याचे आवाहन केले.यवतमाळ जिल्हा संयोजक संग्राम कळणे यांनी आभार प्रदर्शन करताना विवेक विचार मंच अनुसूचित जातीतील बांधवांच्या हितासाठी सदैव तत्पर असल्याचे सांगितले. मंच्याचे ब्रीदवाक्य समता युक्त शोषण मुक्त समाज या ध्येयाप्रती कटिबद्ध असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सचिन मानकर, आशिष विश्वंभरे, विष्णू यांचे विशेष सहकार्य लाभले.संवाद मेळाव्यात विविध समस्या आणि मुद्द्यांवर सखोल चर्चा करण्यात आली. उपस्थितांनी सक्रिय सहभाग घेत, आपली मते मांडली, ज्यामुळे कार्यक्रम अधिक अर्थपूर्ण ठरला.

# सेलू तालुक्यात केंद्र प्रमुखांच्या अभावा मुळे शैक्षणिक व्यवस्थापन अडचणीत

**सेलू । प्रतिनिधी**




सेलू पंचायत समितीच्या शिक्षण विभागात केंद्र प्रमुखांच्या अभावामुळे शाळांच्या व्यवस्थापनावर गंभीर परिणाम होत आहे. तालुक्यातील एकूण १५४ शाळांसाठी ११ केंद्रे असून, मात्र फक्त तीन केंद्र प्रमुख कार्यरत आहेत. त्यामुळे एका केंद्र प्रमुखाकडे तीन ते चार केंद्रांची जबाबदारी आहे, ज्यामुळे व्यवस्थापन आणि तपासणी प्रक्रियेत मोठा अडथळा येत आहे.

प्रत्येक केंद्र प्रमुखाला सुमारे ५१ शाळांची जबाबदारी दिली असून, प्रत्येक शाळेची तपासणी करण्यासाठी तीन महिन्यांचा कालावधी लागत आहे. विशेषतः दुर्गम भागातील शाळांना वेळेवर मार्गदर्शन मिळत नसल्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर नकारात्मक परिणाम होण्याची शक्यता आहे.शिक्षण विभागाच्या कार्यालयातही सुविधांचा अभाव आहे. लवकरच नवीन इमारत पूर्ण होईल, असे सांगण्यात आले असले तरी सध्याच्या परिस्थितीत कर्मचार्यांना कामात अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

# वंचित बहुजन युवा आघाडीच्या तालुका अध्यक्षपदी शुदधोधन बारसागडे यांची निवड

**तळोधी (बा )। प्रतिनिधी**



नागभीड तालुक्यातील गंगासागर हेटी येथील ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच तथा माजी शाळा व्यवस्थापण समिती अध्यक्ष शुद्ध्योधन बारसागडे यांची वंचित बहुजन युवा आघाडीच्या नागभीड तालुका अध्यक्षपदी नुकतीच निवड करण्यात आली आहे.

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष अँड.बाळासाहेब आंबेडकर यांच्या आदेशाने वंचित बहुजन युवा आघाडीच्या नागभीड तालुका अध्यक्षपदी शुद्धोधन बारसागडे यांची निवड करण्यात आली. बारसागडे यांची कार्य करण्याची कार्यतत्परता बघून त्यांची सदर पदावर निवड करण्यात आली आहे.ते वंचित बहुजन युवा आघाडीच्या विकासात्मक कार्यासाठी योग्य कार्य करतील असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .

# आर्थिक व्यवहार झाला दोघा भावांमधील वादाचे कारण

## प्रदीपच्या डोक्यात बॅट घालून सतीशने दिले त्याला मरण



उप विभागीय पोलीस अधिकारी कृष्णात पिंगळे



सहायक पोलीस निरीक्षक भरत चौधरी





मयत प्रदिप इंगळे



आरोपी सतीश इंगळे


**भुसावळ । प्रशांत कुंडकर**

सखखे भाऊ बालपणापासून तरुणपणापर्यंत एकमेकांच्या मदतीला कोणत्याही अडीअडचणीत धावून जातात. जोपर्यंत त्यांचे लग्न होत नाही, तोपर्यंत दोघे एकमेकांना सर्वतोपरी मदत करतात. त्यांच्या मदतीत व्यवहाराचा भाग नसतो. मात्र, त्यांच्या लग्नानंतर आणि संसाराची जबाबदारी पडल्यानंतर, दोघांचे व्यवहार वेगवेगळे होतात. एकमेकांना पैशांची मदत लागली तरी ती मदत करताना परतफेडीचा व्यवहार सुरू होतो.

दोघा सख्ख्या भावांमधील आर्थिक व्यवहार सुरळीत राहिला तर त्यांच्यातील संबंध देखील चांगले राहतात. मात्र, दोघांमधील व्यवहार विस्कळीत झाला की निर्माण झालेला वाद कोणते रूप धारण करेल याचा काही नेम नसतो. भुसावळ तालुक्यातील वरणगाव आयुध निर्माणी वसाहतीत एका भावाने दुसऱ्या भावाची व्यवहाराच्या वादातून डोक्यात बॅट घालून हत्या केल्याची घटना घडली. बिघडलेला व्यवहार सख्ख्या भावाला कसा संताप आणतो आणि त्या संतापातून अप्रिय घटना कशी घडते हे या घटनेतून दिसून आले आहे.

भारत सरकारच्या संरक्षण मंत्रालयाच्या अखत्यारीतील आयुध निर्माण करणारी फॅक्टरी जळगाव जिल्ह्यात भुसावळ आणि वरणगाव या दोन ठिकाणी आहे. भुसावळच्या तुलनेत वरणगाव ऑर्डनन्स फॅक्टरी मोठ्या स्वरूपात आहे. या फॅक्टरीत प्रदीप जयसिंग इंगळे सुपरवायझर पदावर कार्यरत होते. वरणगाव ऑर्डनन्स फॅक्टरीत काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी वर्गासाठी राहण्यासाठी मोठी वसाहत आहे, जी फॅक्टरी इस्टेट म्हणून ओळखली जाते. या इस्टेटमधील क्वार्टर क्रमांक ४४, थ्री टाईपमध्ये सुपरवायझर प्रदीप जयसिंग इंगळे हे राहत होते. प्रदीप इंगळे यांच्या पत्नीचा न्यायालयात वाद सुरू आहे. त्यांच्या पत्नीला न्यायालयीन आदेशाने खावटी सुरू आहे. प्रदीप इंगळे यांना एक मुलगा असून तो त्यांच्यासोबत राहत नाही. त्यामुळे मुक्ताईनगर येथील मूळ रहिवासी असलेले प्रदीप इंगळे हे एकटेच फॅक्टरी इस्टेटमधील क्वार्टरमध्ये राहत होते.

प्रदीप इंगळे यांचा सख्खा भाऊ सतीश इंगळे हा देखील फॅक्टरीत कामाला असून इस्टेटमध्ये राहण्यास आहे. दोघा भावांमध्ये बऱ्याच दिवसांपासून घरगुती मालमत्तेचा वाद सुरू होता. भुसावळ येथे घेतलेल्या जमिनीच्या वादातून सतीश हा प्रदीप इंगळे यांना पाच लाख रुपयांची मागणी करत होता, असे समजते. दोघांमधील वाद आजूबाजूच्या रहिवाशांनाही माहिती होता असे म्हटले जाते.दि. ११ सप्टेंबर २०२४ रोजी नेहमीप्रमाणे दुपारच्या जेवणाच्या सुट्टीत प्रदीप इंगळे हे क्वार्टरला जेवण करण्यासाठी आले. जेवणाच्या निमित्ताने क्वार्टरला आलेले प्रदीप इंगळे यांची या दिवशी भाऊ सतीशच्या हातून जीवनयात्रा संपुष्टात येणार होती. त्या दिवशी ते फॅक्टरीच्या गेटमधून बाहेर आले ते कायमचेच. क्वार्टरलाही ते अखेरचेच आले. जेवणासाठी दुपारच्या वेळी प्रदीप इंगळे क्वार्टरला आल्यानंतर त्यांच्यापाठोपाठ त्यांचा भाऊ सतीश हा देखील आला. तो प्लॉटच्या व्यवहारातील पाच लाख रुपयांची मागणी भाऊ प्रदीप यांना करू लागला. बराच वेळ वाद झाल्यानंतर प्रदीप इंगळे हे भाऊ सतीश याला दीड लाख रुपये देण्यास तयार झाले.



**घटनास्थळाची पाहणी करताना पोलीस अधिकारी**

मात्र, त्यावर सतीशचे समाधान झाले नाही. त्यामुळे तीव्र स्वरूपात त्याचा राग उफाळून आला. या संतापाच्या भरात जवळच पडलेली लाकडी बॅट सतीशने उचलून ती भाऊ प्रदीप इंगळे यांच्या डोक्यात हाणली.

डोक्यात बॅटचा जोरदार घाव बसताच प्रदीप इंगळे जागेवरच कोसळले. त्यांच्या डोक्यातून, नाकातून व कानातून रक्त निघण्यास सुरुवात झाली. लाकडी बॅटचा घाव एवढा जोरदार होता की जमिनीवर रक्ताचा थारोळा जमला. या घटनेची माहिती आजूबाजूच्या रहिवाशांना समजताच घटनास्थळी सर्वजण जमले. भर दुपारच्या वेळी हा खूनाचा प्रकार पाहून काहींनी लागलीच क्वार्टरच्या बाहेर पळ काढला.या प्रकारानंतर मारेकरी सतीशने स्वतःच वरणगाव पोलिस स्टेशनला फोन करून चुकीची माहिती देत पोलिसांची दिशाभूल करण्यास सुरुवात केली. कुणीतरी आपल्या भावाला ठार केले असून तो पळून गेला असल्याची सतीशने वरणगाव पोलिस स्टेशनला माहिती दिली. या घटनेची माहिती मिळताच वरणगाव पोलिस स्टेशनचे प्रभारी सहायक पोलिस निरीक्षक भरत चौधरी यांनी सर्वप्रथम भुसावळ उपविभागीय पोलीस अधिकारी कृष्णात पिंगळे यांना माहिती दिली. तातडीने घटनास्थळी जाऊन सत्य परिस्थिती समजून घ्या आणि मारेकऱ्याचा शोध घ्या, असे निर्देश डीवायएसपी कृष्णात पिंगळे यांनी स.पो.नि. भरत चौधरी यांना दिले.

या घटनेची माहिती दर्यापूर येथील रहिवासी तथा वरणगाव फॅक्टरी बिटचे पोलिस पाटील गिरीश एकनाथ पाटील यांना समजताच ते देखील घटनास्थळी खात्री करण्यासाठी आले. घटनास्थळी प्रदीप इंगळे हे पालथ्या अवस्थेत पडलेले त्यांना दिसले. त्यांच्या डोक्यातून, नाकातून आणि कानातून रक्त निघालेले होते. जागेवर रक्ताचे मोठ्या प्रमाणात थारोळे जमले होते. घटनास्थळी मयत प्रदीप इंगळे यांचा भाऊ सतीश हा हजर होता, मात्र तो उलटसुलट माहिती देत दिशाभूल करत होता.

दरम्यान, घटनास्थळी आपल्या पथकासह आलेल्या स.पो.नि. भरत चौधरी यांनी देखील त्याची सखोल चौकशी केली असता त्याने सुरुवातीला दुसऱ्याचे नाव सांगत त्यानेच आपल्या भावाचा खून केला आणि तो पळून गेला असे सांगू लागला. स.पो.नि. भरत चौधरी यांनी आजूबाजूच्या रहिवाशांच्या चर्चेचा कानोसा घेतला असता मयत प्रदीप इंगळे आणि त्यांचा भाऊ सतीश इंगळे यांच्यात गेल्या कित्येक दिवसांपासून घरगुती मालमत्तेचा वाद सुरू होता अशी माहिती मिळाली.त्यामुळे संशयाची सुई सतीश इंगळे याच्यावर स्थिरावली. त्याला वरणगाव पोलिस स्टेशनला आणून डीवायएसपी कृष्णात पिंगळे यांच्यासमक्ष हजर करण्यात आले. डीवायएसपी पिंगळे यांच्यासह स.पो.नि. भरत चौधरी यांनी पोलिसी खाक्या वापरून त्याची सखोल चौकशी केली असता त्याने आपला गुन्हा कबूल केला. मात्र, भाऊ प्रदीप यास जीवाने मारण्याचा आपला कोणताही हेतू नव्हता असे देखील त्याने कबूल केले. व्यवहाराच्या वादातून संतापाच्या भरात आपल्या हातून भाऊ प्रदीप याच्या डोक्यावर बॅट मारली गेली. मात्र, त्या हल्ल्यात भाऊ प्रदीप याचा मृत्यू झाल्याचे सतीशने कबूल केले. सतीशचा स्वभाव हा अतिशय रागीट असल्याचे त्याच्या वर्तनातून आणि बोलण्यातून पोलिसांना जाणवले.

या घटनेप्रकरणी पोलिस पाटील गिरीश पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीवरून वरणगाव पोलिस स्टेशनला संशयित सतीश इंगळे याच्याविरुद्ध खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेचा पुढील तपास स.पो.नि. भरत चौधरी व त्यांचे सहकारी करत आहेत.

# खंडणी बहाद्दर पत्रकाराचा जामीन अर्ज जिल्हा व सत्र न्यायालयाने फेटाळला

**यवतमाळ । प्रशांत कुंडकर**

घाटंजी येथील एका पत्रकाराने घाटंजी पोलिस स्टेशन मधील सेवानिवृत्त पोलिस उप निरीक्षक विलास गोविंदराव सिडाम (वय ५८) यांस १५,००० रुपयाची खंडणी मागून जातीवाचक शिवीगाळ केल्या प्रकरणी आरोपी कज्जूम कुरेशी (वय ४४) विरुद्ध भारतीय न्याय संहिता ३०८ (२), अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती कायदा १९८९ ट्रोसीटी क्ट ३ (१) (ी), ३ (१) (ड) ३ (२) (ीं) अंतर्गत गुन्हा दाखल केला होता.

सदर प्रकरणात आरोपी कज्जूम कुरेशी याने यवतमाळचे जिल्हा न्यायाधीश – २ तथा अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश ए. ए. लऊळकर यांच्या न्यायालयात अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला होता. मात्र, मंगळवारी आरोपी पत्रकार कज्जूम करीम कुरेशी याचा अटकपूर्व जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळला. सरकारी पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता ड. नरेंद्र पांडे यांनी शासनाची बाजू मांडली.

सदर प्रकरणाचा तपास पांढरकवडा येथील उप विभागीय पोलिस अधिकारी रामेश्वर व्यंजने हे करित असुन, पांढरकवडा येथील उप विभागीय पोलिस अधिकारी रामेश्वर व्यंजने यांचे पथक आरोपीला अटक करण्यासाठी वाशिम जिल्ह्यातील कारंजा व नागपूर येथे पोलिस पथक रवाना झाल्याची विश्वासनिय माहीती प्राप्त झाली आहे.

पोलिस स्टेशन घाटंजीचे सेवानिवृत्त पोलिस उपनिरीक्षक विलास सिडाम हे दिनांक ३० जून रोजी सेवानिवृत्त झाले होते. त्यांच्या घराचे बांधकाम सुरू असल्याने सद्या ते संपूर्ण कुटूंबासह पोलिस स्टेशनच्या क्वार्टर मध्ये राहत होते. तथापि, दैनिक साहसिक व दैनिक मतदारचे घाटंजी वार्ताहर कज्जूम कुरेशी यांना मी अनेक वर्षांपासून ओळखतो. तसेच सिडाम यांचे निवृत्ती वेतनाचे पैसे मिळायचे असल्याने ते पोलिस स्टेशनच्या सरकारी निवासस्थानी वास्तव्य करित आहे. तेव्हा, पत्रकार कज्जूम कुरेशी यांनी सिडाम यांना सांगितले की, तुम्ही सरकारी क्वार्टर सोडत नाही म्हणून 'मी तुमची बातमी तयार केली आहे'. अगर पेपर में नही छापना है तो, मुझे १५,००० रुपये देना पडेगा, असे



सिडाम यांना म्हटले. तेव्हा, सिडाम यांनी सांगितले की, मला एक दोन महिने सरकारी क्वार्टर मध्ये थांबायचे आहे. नंतर माझ्या घराचे बांधकाम झाल्यावर मी स्वतः सरकारी क्वार्टर सोडून देईन, असे सिडाम यांनी म्हटले. 'अगर तुम पैसे नही दिये तो तुम्हारी बातमी मैं पेपरमें छापता', अशी धमकी पत्रकार कज्जूम कुरेशी यांनी सिडाम यांना दिली.

तेव्हा, सिडाम यांनी सद्या माझ्या जवळ २,००० रुपये आहे. पैसे भेटायचे आहे. सद्या तंगी आहे, असे सिडाम यांनी सांगितले. संबंधित पत्रकाराने मला १५,००० रुपये द्या म्हणून सिडाम यांच्या मागे तगादा लावला व सद्या २००० रुपये तरी द्या. उर्वरित रक्कम उद्या द्या, असे पत्रकार कज्जूम कुरेशी यांनी सांगितले. तेव्हा, सिडाम यांनी म्हटले की, मेरे पास अभी पैसे नही जमते. बादमें देखेगें असे म्हणून सिडाम हे आपल्या क्वार्टरकडे निघून गेले. दिनांक १९ सप्टेंबर रोजी व्हॉटसप ग्रुप वर विदर्भ मतदार या वृत्तपत्राचे एक बातमी आली. त्या बातमीत सिडाम हे राहत असलेल्या पोलिस स्टेशन क्वार्टरची बातमी कज्जूम कुरेशी यांनी प्रसारित केली होती, असा आरोप सिडाम यांनी केला. त्यामुळे पेपरला बातमी आल्याने सिडाम यांची मानहानी व बदनामी झाली, असे सांगितले. तसेच दिनांक २१ सप्टेंबर रोजी सिडाम हे मार्केट मध्ये भाजीपाला आणण्यासाठी गेले होते.

भाजीपाला घेऊन परत येतांना पोलिस स्टेशनच्या दाराजवळ पत्रकार कज्जूम कुरेशी हा बाजूला मोटार सायकल लाउन उभा होता. तेथुन सिडाम हे जात होते. तेव्हा संबंधित पत्रकार कज्जूम कुरेशी यांनी सिडाम यांना आवाज देउन थांबविले व म्हणाला की, 'जम गई क्या बातमी'. तेव्हा सिडाम यांनी सांगितले की, 'भैय्या मैने तुमको २००० रुपये दिये और भी देता करके बोला था'. तो भी तुमने तुम्हारे पेपर में मेरे खिलाफमें बातमी प्रकाशित की है, असे म्हटले असता बाकी के पैसे अभी देदो, नही तो सभी पेपर में तुम्हारे फोटो सहीत बातमी लगायेंगे, अशी धमकी सिडाम यांना दिली. विशेष म्हणजे पत्रकार कज्जूम कुरेशी विरुद्ध या पुर्वीही घाटंजी पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल असुन, त्यात खंडणीच्या गुन्ह्याचा समावेश आहे, हे येथे उल्लेखनीय.

सदर प्रकरणाचा पुढील तपास पांढरकवडा येथील उप विभागीय पोलिस अधिकारी रामेश्वर व्यंजने हे करित आहे. यवतमाळ न्यायालयात घाटंजी येथील आरोपी पत्रकाराचा जामीन अर्ज फेटाळल्याने यवतमाळ जिल्ह्यात मात्र खळबळ उडाली आहे.

# बदामराव पंडितांना उमेदवारी जाहीर होताच राष्ट्रवादीच्या असंख्य कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश

## तलवाड्यात रा.कॉ. ला पडले पहिले खिंडार

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई विधानसभा मतदारसंघातून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून महाविकास आघाडीची उमेदवारी माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांना जाहीर होतात तलवाड्यातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या असंख्य कार्यकर्त्यांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केल्याने राष्ट्रवादीला पहिले खिंडार पडले आहे.



गेवराई विधानसभा मतदारसंघाची महाविकास आघाडीचे उमेदवार कोणाला मिळेल या चर्चेचे गुऱ्हाळ आणि दिवस चालल्यानंतर अखेर शिवसेना नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने महाविकास आघाडीची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे यामुळे तालुक्यात ठिकठिकाणी जल्लोष होत असून, लवकरच राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपाचे अनेक कार्यकर्ते शिवसेनेमध्ये प्रवेश करणार असल्याची माहिती मिळत आहे. त्यातच तलवाडा येथील राष्ट्रवादी काँग्रेसचे गजानन नाटकर, किसन रोकडे, विशाल खरात, सोपान खपाटे, विशाल हातागळे, राहुल हातागळे, निखिल ढगे, संतोष हातागळे, कृष्णा हातागळे, अरुण रोकडे, सागर रोकडे, ओमकार गांधले, धर्मा साबळे, संजू हातागळे, राजाभाऊ रोकडे, विजय कांबळे, आकाश खरात, विनोद कांबळे आदींसह असंख्य कार्यकर्त्यांनी माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात जाहीर प्रवेश करून, यावेळी बदामराव पंडित यांना आमदार करून गेवराई विधानसभा मतदारसंघावर शिवसेनेचाच भगवा फडकेल असा विश्वास या कार्यकर्त्यांनी व्यक्त केला. या प्रवेशामुळे तलवाड्यातून राष्ट्रवादी काँग्रेसला मोठे खिंडार पडले आहे. प्रवेश केलेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचे बदामराव पंडित युवा नेते यशराज पंडित यांनी गळ्यात भगवे रुमाल घालून स्वागत केले. यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख बबलू खराडे यांच्या सहच शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राज्यातील गुणवंत कामगारांना मोफत परिवहन मंडळ प्रवास सवलत मिळावी या मागणीला कामगार मंत्रालयाकडून वाटाण्याच्या अक्षदा

**जालना । प्रतिनिधी**

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ यांच्याकडून देण्यात येणाऱ्या राज्य पातळीवरील गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार प्राप्त व्यक्ती जे सतत सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक कार्यामध्ये अग्रेसर असतात अशा गुणवंत कामगारांना महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ यांचे मोफत प्रवास करण्यात यावा यासाठी गेल्या दोन वर्षापासून सतत माजी कामगार राज्यमंत्री सुरेश खाडे यांच्याकडे पाठपुरावा करूनही त्यांनी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता केलेली नाही. त्या राज्यातील गुणवंत कामगारांच्या परिवहन मंडळ प्रवास सवलत मिळावी या मागणीला कामगार मंत्रालयाकडून कामगार मंत्रालयाकडून वाटाण्याच्या अक्षदा मिळाल्या आहेत.

याबाबत महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ यांनीही कामगार मंत्री यांच्याकडे महामंडळाला कुठल्याही प्रकारचा आर्थिक बोजा पडणार नाही अशा त-हेने प्रस्ताव सादर केलेला होता. याबाबत कामगार कल्याण मंडळ सकारात्मक भूमिकेत होते तरीही त्यांना नुसते तोंडी आश्वासने देऊन शेवटच्या क्षणापर्यंत कामगारांना झुलवत ठेवून मागणी मान्य केलेली नाही. त्यामुळे राज्य गुणवंत कामगार असोसिएशन महाराष्ट्र अच्युतराव माने यांनी नाराजी यक्त केली. याबाबतचे निवेदन धाराशिव जिल्हा गुणवंत कामगार असोसिएशनच्या वतीने जिल्हा सचिव वासुदेव वेदपाठक, कार्याध्यक्ष बाबासाहेब गरड व जिल्हा प्रतिनिधी पदाधिकारी शाहूराज कावरे, विजय गायकवाड, हरिभाऊ भोसले व सहकारी नबी शेख यांनी प्रसिद्ध केल्याची माहिती रामेश्वर वरखडे यांनी दिली.

# भाजपने केजच्या जागेचा पुनर्विचार करून पप्पू कागदेंना उमेदवारी द्यावी

## अन्यथा जिल्ह्यात भाजपला धडा शिकवू ;केजच्या बैठकीत रिपाइं कार्यकर्त्यांचा एल्गार

**केज । प्रतिनिधी**

महायुतीने केजच्या जागे संदर्भात पुनर्विचार करून जागा रिपाइंचे नेते युवा प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांना उमेदवारी देण्यात यावी. या मागणीसाठी रिपाइं कार्यकर्ते आक्रमक झाले असून जर पप्पू कागदे यांना भाजपने उमेदवारी दिली नाही. तर भाजप आणि त्यांच्या उमेदवारांना जिल्ह्यात फिरू देणार नाही. तसेच अनुसूचित जातींच्या आरक्षणाच्या मुद्द्याला हरताळ फासणाऱ्या मुंदडा परिवाराला राजकारणातून हद्दपार करू. असा निर्धार कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आणि भाजप आणि त्यांच्या नेत्या विरुद्ध प्रचंड आक्रोश व्यक्त केला आहे. केज विधान सभेसाठी ना. रामदास आठवले यांनी पप्पू कागदे यांच्या नावाची घोषणा केलेली असताना देखील महायुतीने परस्पर उमेदवारी जाहीर करून मित्र पक्ष रिपांच्या पाठीत खंजीर खुपसण्याचा काम केले. या बाबत रिपाइं कार्यकर्त्यात प्रचंड प्रमाणात नाराजी आणि खदखद आहे. त्या निमित्त भाजपने त्यांच्या निर्णयाचा फेर विचार करावा अशी भावना व्यक्त केली. तसेच जर भाजपने त्यांचा निर्णय मागे घेतला नाही. तर जिल्ह्यात कमळ फुलणार नाही आणि फुलू देणार नाही. अशा तीव्र भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केल्या आहेत. पप्पू कागदे हे जनमानसातील नेतृत्व असून



तळागाळातील सामान्य माणसांच्या अडीअडचणीच्या प्रसंगी ते धावून जातात. त्यांच्या माध्यमातून जिल्हा आणि राज्यात रिपाइंचे प्रचंड मोठी ताकद निर्माण झालेली आहे. वेगवेगळ्या मोर्चे सभा आंदोलने यांच्या माध्यमातून त्यांनी बहुजन समाजाला न्याय देण्याचे काम केलेले आहे. मराठा समाजाला आरक्षण देण्याची मागणी असो की, गायारान हक्क परिषद यांच्या माध्यमातून सर्व समाजाला आणि अठरा पगड जाती धर्माला न्याय देण्याचे काम करीत आहेत. पप्पू कागदे एक.प्रामाणिकणे गेल्या अनेक वर्षा पासून करीत आहेत. केज मतदार संघाचे सक्षम उमेदवार म्हणून त्यांच्या नावाची अनेक वर्षा पासून जिल्ह्यातच नव्हे तर राज्यात चर्चा असताना देखील त्यांना डावलले असल्याने मतदार संघात भाजप विरोधात लाट निर्माण झाली आहे.

पप्पू कागदे यांच्या समर्थनार्थ केज रिपाइं कार्यकर्त्यांनी केज तालुका अध्यक्ष दिपक कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली तातडीची बैठक आयोजित केली होती. बैठकीला मराठवाडा संघटक गोवर्धन वाघमारे, जिल्हा संघटक रवींद्र जोगदंड, राजेश सोनवणे, राहूल सरवदे, विकास अरकडे निलेश ढोबळे, दिलीप बनसोडे, गौतम बचुटे यांच्यासह हरेंद्र तुपारे दादाराव धेंडे, गोरोबा बनसोडे, गोरोबा बनसोडे, सूरज काळे, सुरेश गायकवाड, रोहित बचुटे, विनोद शिंदे, शिवाजी बनसोडे, हरीश गायकवाड, विनोद गायकवाड, रघुनाथ ढालमारे, रोहित कांबळे, मधुकर तुपारे, काकासाहेब कांबळे यांच्या तालुक्यातील शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

**नमिता मुंदडांना निवडणूक जड जाणार !:-** मराठा आरक्षण आणि ओबीसी आरक्षण यात आमदार मुंदडा यांची भूमिका रिपाइंचे विरोध यामुळे मुंदडा आणि भाजपला जड जाणार असल्याची लक्षणे दिसून येत आहेत.

**कमळ हद्दपार करू कार्यकर्त्यांची भावना :-** बैठकीला जमलेल्या कार्यकत्यांनी अत्यंत तीव्र शब्दात भाजपा आणि जिल्ह्यातील नेतांचा निषेध व्यक्त करून कमळ हद्दपार करू अशा भावना व्यक्त केल्या

**दलितांच्या प्रश्नावर आमदारांची भुमिका काय ? :-** तालुक्यातील दलितांचे स्मशानभूमीचे प्रश्न, गायारान आणि मराठा व ओबीसी आरक्षण या बाबत त्यांची स्पष्ट भूमिका नसल्याने याचा त्यांच्या मतदानावर परिणाम होवू शकतो.

**पप्पू कागदे आश्वासक चेहरा :-** पप्पू कागदे हे जिल्ह्यातील सर्वसमावेशक आणि आश्वासक नेतृत्व असून ओपन, ओबीसी, दलीत, मुस्लिम प्रवर्गातील त्यांना मानणारा प्रचंड वर्ग आहे. त्याचा फायदा त्यांना मिळू शकतो.

भाजपने आम्हाला लोकसभा निवडणुकीच्या वेळी केजची जागा देण्याचे आश्वासन देवून ही आमच्या पाठीत खंजीर खुपसला. याचा बदला घेवून आम्ही मुंदडा यांना हद्दपार करू.-दिपक कांबळे, तालुका अध्यक्ष, केज

# साधा माणूस म्हणून राम शिंदेंचा मार्ग झाला अधिक सुकर

**अहमदनगर । प्रतिनिधी**

पवारांचा नातू म्हणून पाच वर्षापूव स्वीकारल्यानंतर कर्जत- जामखेडकरांच्या मोठ्या अपेक्षा रोहीत पवार यांच्याकडून होत्या. मात्र, प्रत्यक्षात त्या साऱ्या अपेक्षांचा भंग झाला. राज्याचे नेतृत्व करण्याची हवा डोक्यात गेलेले रोहीत पवार हे आता कर्जत जामखेडकरांच्या डोक्यात गेल्यात जमा आहेत. त्यातुनच आपला हक्काचा भूमिपुत्र म्हणून राम शिंदे यांच्यासाठी आता गावागावातील कार्यकर्त्यांनी मोर्चेबांधणी चालवली असल्याचे दिसते.

पाच वर्षापूव रोहीत पवार यांनी या मतदारसंघात उमेदवारी करताना अनेक स्वप्ने दाखवली. शरद पवार यांचा नातू म्हणून जनतेच्या देखील मोठ्या प्रमाणात अपेक्षा निर्माण झाल्या. विशेषत: या मतदारसंघातील एमआयडीसी, कर्जतचा एसटी डेपो, जामखेड पाणी योजना, यासह रद्द झालेली एमआयडीसी अनेक प्रश्न आजही प्रलंबीत आहेत. राज्याच्या विविध प्रश्नांवर बोलणारे रोहीत पवार स्थानिक त्यांच्याच मतदारसंघातील अनेक प्रश्न सोडविण्यात सपशेल अपयशी ठरले असल्याचे लपून राहिलेले नाही. बाजूला ठेवून रोहीत पवार यांनी तरुणाईला हाताशी धरले. मात्र, त्यांचा पवार यांनी फक्त वापरच केल्याचे दिसून येत आहे. गावागावातून यामुळेच त्यांच्या विरोधात मोठ्या प्रमाणात संताप व्यक्त होत असून रोहीत पवार यांना हीच तरुणाई आता जाब विचारू लागली असल्याचे गावागावांमधून दिसून येत आहे.

राम शिंदे हे मागील निवडणुकीत पराभूत झाले. मात्र, त्यांनी मतदारसंघात संपर्क कायम ठेवला. विधान परिषदेवर संधी मिळाल्यानंतर राम शिंदे यांनी मतदारसंघात विकास कामे माग लावण्याचा धडाका लावला. सामान्य कुटुंबातील राम शिंदे हे आता या दोन्ही तालुक्यातील जनतेला आपला माणूस वाटू लागले आहेत. रोहीत पवार यांचा गर्विष्ठ स्वभाव आणि संपर्काचा अभाव यातून कामे माग न लागल्याने जनतेत रोष निर्माण झाला आहे. त्यामुळेच राम शिंदे यांच्यासाठीचा मार्ग अधिक सुकर झाला असल्याचे दिसून येत आहे. राज्यात नेतृत्व करण्यास ते सज्ज झाले असले तरी या दोन्ही तालुक्यातील अनेक प्रश्न आज तसेच पडून आहेत. जनतेच्या अपेक्षांचा भ्रमनिरास झाला आहे. त्यामुळेच रोहीत पवार यांच्या विरोधात या दोन्ही तालुक्यात मोठ्या प्रमाणात वातावरण निर्माण झाले आहे.

# विवेकानंद महाविद्यालयात माजी कर्तबगार विद्यार्थ्यांचा सत्कार

**छत्रपती संभाजीनग । नतिनिधी**

विवेकानंद महाविद्यालयाच्या मराठी विभागाच्या वतीने माजी कर्तबगार विद्यार्थ्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. अध्यक्ष म्हणून इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. ज्ञानेश्वर सूर्यवंशी, तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. सोमनाथ वांजरवाडे ,मराठी विभागप्रमुख प्रा.दत्तात्रय डुंबरे उपस्थित होते. या कार्यक्रमामध्ये प्रा. चंद्रकांत काईट, प्रा. अंकुश सोनवणे आणि स्वप्निल तायडे या माजी विद्यार्थ्यांनी खडतर परिस्थितीत महाविद्यालयात शिक्षण घेऊन पुढील काळात विविध क्षेत्रात संघर्षमय जीवन जगून यश संपादन केले. ते आज शिक्षण, बँक या क्षेत्रामध्ये मोठ्या पदावर कार्यरत आहे. प्राचार्य डॉ. दादाराव शेंगुळे यांच्या हस्ते खडतर परिस्थितीतून व अपंगात्वावर मात करून प्राध्यापक झालेल्या अंकुश सोनुने यांचाही विशेष सत्कार करण्यात आला.

प्रास्ताविक प्रा. ईश्वर अडसूळ यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. विवेक घोलप यांनी, तर आभार प्रा. कविता कुंटे यांनी मानले. या प्रसंगी प्रा.चंद्रकांत काईट, स्वप्नील तायडे (बँक अधिकारी), प्रा. अंकुश सोनुने यांनी आपले मनोगत मांडताना आपल्या गुरू आणि महाविद्यालयाविषयी ऋण व्यक्त केले. यावेळी एमएच्या विद्यार्थ्यांसाठी उजळणी वर्गाचेही आयोजन करण्यात आले होते. समारंभ यशस्वी पार पाडण्यासाठी डॉ.ज्योती चव्हाण, डॉ. अभय मंडलिक, भयवाळ यांनी परिश्रम घेतले.

# ज्ञानाची तहान आणि विचारांनी महान होण्यातच देवत्त्व होय-प्रा.विलासराव तुळे

**श्रीरामपूर । प्रतिनिधी**

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेत शिक्षण आणि नोकरी करताना समाधान लाभले. अशा जीवन वाटचालीत ज्ञानाची तहान आणि विचारांनी महान होण्यात खरे देवत्त्व असल्याचा अनुभव आल्याचे मत रयत शिक्षण संस्थेतून सेवानिवृत्त झालेले प्रा. विलासराव शिवाजी तुळे यांनी व्यक्त केले.

येथील श्रीसंत गोरा कुंभार प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष प्रा. विलासराव तुळे यांचा वाचन संस्कृती प्रतिष्ठान, श्रीरामपूर, कराड येथील प्रा. भगवान पाटील, प्रा. पोपटराव काटकर, सातारा येथील कर्मवीर भाऊराव विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. विजयराव कुंभार इत्यादी मान्यवरांनी केलेल्या सत्कार प्रसंगी ते बोलत होते. यानिमित्ताने वाचन संस्कृती प्रतिष्ठानचे संस्थापक,अध्यक्ष डॉ. बाबुराव उपाध्ये



यांनी प्रा. तुळे यांचा सन्मान करून झालेल्या विविध सत्काराबद्दल कौतुक केले. कराड येथील गुरुवर्य प्रा. भगवान पाटील, प्रा. पोपटराव काटकर यांनी तुळे यांच्या कष्टप्रद आणि ज्ञानामय वाटचालीचे कौतुक केले. कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. विजयराव कुंभार म्हणाले, प्रा.तुळे यांनी सातारा येथे शिक्षण घेतले. राहाता,मंचर, कोळपेवाडी, नगर, बोधेगाव,मोखाडा इत्यादी शाखेत प्रामाणिकपणे मराठी विषयाचे अध्यापन केले. त्याविषयी त्यांचा सत्कार म्हणजे रयतनिष्ठ आणि ज्ञाननिष्ठेचा सत्कार होय, असे गौरवोद्गार काढून शाल, बुके ,भेटवस्तू देऊन सन्मान केला. याप्रसंगी कुंभार समाज महासंघ महाराष्ट्र राज्य अध्यक्ष सतिशदादा दरेकर, प्रदेश उपाध्यक्ष चंद्रकांत कुंभार, रामदास कुंभार, कुंभ विकास साप्ताहिकचे मुख्य संपादक दिगंबर इंगळे पुणे, लक्ष्मण कुंभार,भाऊसाहेब आवडकर, गजानन कोळमकर, विश्वनाथ कोळमकर, अनिल झोजे पुणतांबा तसेच शिऊर येथील गवळी बंधूसह अखिल भारतीय प्रजापती (कुंभकार) कुंभार संघ पदाधिकारी, गुणवंत मान्यवर सत्कारमूर्ती आणि समाज बांधव उपस्थित होते. प्रा. विलासराव तुळे यांनी काठापूर गावातील शिक्षण आणि शिक्षणासाठी केलेल्या भ्रमंतीच्या आठवणी सांगितल्या. गुरुवर्य प्रा.बी. डी. पाटील, डॉ.बाबुराव उपाध्ये इत्यादीसारखे शिक्षक लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली जीवनाला योग्य दिशा मिळाली. श्रीरामपूरला स्थायिक होऊन प्रगती करता आली असे अनुभव सांगून अनेकांनी केलेल्या सत्काराबद्दल आभार मानले.

## शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजारांची मदत द्यावी

# शेतकऱ्यांची मागणी मुसळधार पावसाने पिकांचे आतोनात नुकसान



**खुलताबाद । प्रतिनिधी**

खुलताबाद व परिसरात परतीचा पाऊस झाल्याने त्याचा फटका शेतीपिकांना बसला आहे. शेकडो हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. काढणी आलेले सोयाबीन व कापूस भिजून काळवंडला आहे. प्रशासनाने त्वरित पंचनामे करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

बाजार सावंगी महसूल मंडळात उन्हाळी कांद्याचे बियाणे टाकलेल्या शेताला सततच्या पावसाच्या पाण्याचा फटका बसला आहे. त्यामुळे रोपांवर मर पडला. शेतकरी हवालदिल झाले आहेत. बाजार सावंगी गाव व परिसरात झालेल्या मुसळधार पावसाने कापसाची वाती झाल्या, तर सोंगणी करून शेतात ठेवलेली सोयाबीन मका.भिजून त्याला कोम फुटले आहे. या आप्तकालीन परिस्थितीत प्रशासनाने शेतकऱ्यांना हेकटरी ५० हजार रुपयांची मदत द्यावी, अशी मागणी बाजार सावंगी येथील शेतकरी .मुनीर अब्बास शाह . यांच्यासह शेतकऱ्यांनी केली आहे.

# विधानसभा निवडणुकी करिता केज तालुका शिवसेना सज्ज

## उद्धवजी ठाकरे साहेब यांना मुख्यमंत्री करण्यासाठी शिवसैनिकांचा निर्धार

## जिल्हाप्रमुख रत्नाकर शिंदे व तालुकाप्रमुख अशोक जाधव यांनी गद्दारांना जागा दाखवण्याचे केले आवाहन

**केज । प्रतिनिधी**

शिवसेना-उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख मा.उद्धवजी बाळासाहेब ठाकरे युवासेनाप्रमुख आदित्यजी ठाकरे साहेब यांच्या आदेशावरून, मराठावाडा संपर्कप्रमुख सुनिल प्रभु साहेब,शिवसेना उपनेत्या प्रा.सुषमा ताई आंधारे,शिवसेना बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुराम जाधव, लोकसभा प्रमुख सुनील दादा धांडे ,शिवसेना सहसंपर्कप्रमुख बाळासाहेब आंबुरे यांच्या मार्गदर्शनाखाली, जिल्हाप्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे यांच्या उपस्थितीत येणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आज बुधवार रोजी केज शिवसेना संपर्क कार्यालय येथे केज तालुका शिवसेना पदाधिकार्यांची व बुथप्रमुखांची महत्वपूर्ण बैठक तालुकाप्रमुख अशोक जाधव यांच्या आयोजनात संपन्न झाली .यावेळी उपस्थित उपजिल्हाप्रमुख दिपक मोराळे, तालुकाप्रमुख अशोक जाधव, युवासेना जिल्हाप्रमुख सोमनाथ गित्ते, जिल्हा समन्वय अनिल देशमुख,जिल्हासचिव रोहित कसबे,जिल्हासहसंघटक दिलीप जाधव,शहरप्रमुख तात्या रोडे, युवासेना तालुकाप्रमुख किशोर घुले, तालुका सचिव सखाराम वायबसे,तालुकासंघटक सुधिर जाधव,लक्ष्मण गलांडे, उपतालुकाप्रमुख सुभाष ठोंबरे,सुरज वाघमारे,शहरसचिव जाहेद शेख, उपशहरप्रमुख पप्पू ढगे,पप्पू कोल्हे, युवासेना शहरप्रमुख अनिकेत गायकवाड, उपतालुकाप्रमुख दिलीप गालफाडे, अश्रफ शेख, दत्ता तांदळे,शहदेव भोसले, ज्ञानेश्वर बोबडे, रामभाऊ पवार, दिलीप खाडे, गणेश निंगुळे, बाळासाहेब कसबे,राजाभाऊ मोटे,विनायक वनवे, आप्पा कांबळे, मधुकर अंधारे,हरिष गिते, अमोल घुले, गोकुळ मोरे,आतम घाडगे, वैजनाथ वाघमारे, शिवाजी इंगळे, बहादुर शेख, राहुल फुके,राम इंगळे,अगंद देशमुख,सह शिवसैनिक उपस्थित होते.

